# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत इंदिरा गांधी दवाखान्याच्या
**{विद्युत विभाग}** इमारतीत असलेल्या लिफ्टची 1 वर्षाकरीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत.

धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत इंदिरा गांधी दवाखान्याच्या इमारतीत असलेल्या लिफ्टची 1 वर्षाकरीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करुन घेण्याकरीता CPWD Manual नुसार ज्या कंपनीची लिफ्ट आहे, त्याच मुळ उत्पादकाकडून लिफ्टची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करुन घेण्यास्तव मे. कोने एलिव्हेटर्स इं.प्रा.लि. यांना त्यांचे आवेदन क्र. T-0006973190_1 अन्वये रू. 3,24,024/— चा कार्यादेश (जी.एस.टी.सह) विना निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची '3' मधील प्रकरण 5 (2) (2) मधील तरतुदीनुसार देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— 1) पद क्रमांक A22301730832 अंतर्गत रू. 3,24,024/— चे प्रावधान उपलब्ध आहे.
2) या कामास प्रशासकीय मान्यता आदेश क्र. 194/DyMC/2024, दिनांक 19/01/2024 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
3) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 724/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 06/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत इंदिरा गांधी दवाखान्याच्या इमारतीत असलेल्या लिफ्टची 1 वर्षाकरीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत.

धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत इंदिरा गांधी दवाखान्याच्या इमारतीत असलेल्या लिफ्टची 1 वर्षाकरीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करुन घेण्याकरीता CPWD Manual नुसार ज्या कंपनीची लिफ्ट आहे, त्याच मुळ उत्पादकाकडून लिफ्टची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करुन घेण्यास्तव मे. कोने एलिव्हेटर्स इं.प्रा.लि. यांना त्यांचे आवेदन क्र. T-0006973190_1 अन्वये रू. 3,24,024/— चा कार्यादेश (जी.एस.टी.सह) विना निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची '3' मधील प्रकरण 5 (2) (2) मधील तरतुदीनुसार देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.